



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**




● वर्ष : ०३ ● अंक : ००९ ● पुणे ● रविवार, दि. २१ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





वारजे डुक्करखिंड–तिरुपतीनगर डीपी रस्ता... 3





सरचिटणीस पदी बापूसाहेब पोकळे पाटील यांची निवड 4


# पुन्हा भिडणार पाकला नडणार

## आज रंगणार 'संडे ब्लॉकबस्टर'!

## रात्री ८ वाजता लढतीला सुरुवात

**भारत :** सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, जितेश शर्मा (यष्टिरक्षक), शिवम दुबे, अक्षर पटेल, जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंह, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, हर्षित राणा, संजू सॅमसन, रिंकू सिंह.

**पाकिस्तान :** फखर जमां, हसन नवाज, खुशदिल शाह, सैम अयूब, सलमान आघा (कर्णधार), हुसैन तलत, फहीम अशरफ, मोहम्मद नवाज, मोहम्मद हारिस, साहिबजादा फरहान, अबरार अहमद, हारिस रौफ, हसन अली, सलमान मिर्जा, शाहीन शाह अफरीदी, सुफियान मुकीम, मोहम्मद वसीम जूनियर.

**दुबई (दै. आरंभ पर्व)**

आशिया चषकातील सुपर-4 लढतीत भारत-पाकिस्तान हे कट्टर, पारंपरिक प्रतिस्पर्धी पुन्हा एकदा आमनेसामने भिडत असून येथेही भारत पहिल्या सामन्याप्रमाणेच पाकिस्तानवर जोरदार वर्चस्व गाजवेल, अशी अपेक्षा आहे. शेकहँड मुद्द्यावरून निर्माण झालेला ताणतणाव, त्यानंतर पाकिस्तान संघाने घेतलेली टोकाची भूमिका आणि त्याचे विविध स्तरावर उमटत आलेले संतप्त पडसाद, या साऱ्या पार्श्वभूमीवर, ही लढत दोन्ही संघांचा आणखी कस घेणारी ठरेल, हे निश्चित आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार, रात्री 8 वाजता या लढतीला सुरुवात होईल.




पाकिस्तानचा संघ आपल्या अनिश्चित खेळासाठी ओळखला जातो, पण सध्याच्या संघात फलंदाजी लाईनअपमध्ये दर्जेदार खेळाडूंचा अभाव दिसत आहे. विशेषतः संथ गोलंदाजांचा सामना करताना ते बरेच चाचपडत आले आहेत. जावेद मियाँदाद, इंझमाम-उल-हक, सलीम मलिक आणि इजाज अहमद यांसारखे महान फलंदाज देणाऱ्या या देशासाठी सध्याच्या खेळाडूंची फलंदाजीची शैली फारशी प्रभावी नाही. मागील दोन सामन्यांत शून्यावर बाद होणारा सलामीवीर सईम अयुबवर आणखी दडपण निर्माण झाले आहे. सईम अयुबला सईद अन्वरसारखा फलंदाज व्हायचे होते, पण तो सईद अजमलसारखा गोलंदाज बनत आहे, अशा विनोदी प्रतिक्रिया त्याच्या कामगिरीबद्दल ऐकायला मिळत आहेत. याचे कारण म्हणजे त्याने फलंदाजीपेक्षा गोलंदाजीत अधिक यश मिळवले आहे.

या स्पर्धेत सूर्यकुमार यादव फलंदाज आणि कर्णधार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारताचा अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेलला झेल घेताना डोक्याला दुखापत झाल्याने चिंतेचे वातावरण होते. मात्र, तो लवकरच बरा होईल, असे संघाचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप यांनी सांगितले. भारताच्या गोलंदाजांची कामगिरी पाहता, हर्षित राणा आणि अर्शदीप सिंग ओमानच्या खेळाडूंसमोर प्रभाव पाडू शकले नाहीत. मात्र, आजच्या सामन्यात जसप्रीत बुमराह आणि वरुण चक्रवर्ती हे दोघेही संघात परतणार असल्याने गोलंदाजी अधिक मजबूत होईल. दुबईच्या मैदानावर संथ गोलंदाजांना मदत मिळत असल्याने, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांच्यावर मुख्य जबाबदारी असेल. जर अक्षर पटेल तंदुरुस्त नसेल, तर त्याच्या जागी वॉशिंग्टन सुंदर किंवा रियान परागला संधी मिळू शकते.

आशिया चषकात भारत-पाकिस्तान यांच्यात होणारा सामना नेहमीच उत्कंठावर्धक असतो. रविवारी दुबईमध्ये होणाऱ्या 'सुपर-4'च्या सामन्यातही असाच थरार पाहायला मिळेल, अशी अपेक्षा आहे. कर्णधार सूर्यकुमार यादवची या लढतीत पुन्हा एकदा फिरकी गोलंदाजीवर भिस्त असणार आहे. गेल्या रविवारी भारत-पाकिस्तान यांच्यातील सामन्यात दोन्ही संघांनी हस्तांदोलन केले नव्हते, त्यामुळे वादंग निर्माण झाले. आता आजच्या लढतीतही भारतीय संघ हीच भूमिका कायम ठेवण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानकडून सध्या फक्त फखर जमान आणि शाहिन शाह आफ्रिदी हे दोघेच खेळाडू प्रभावी कामगिरी करू शकतात. शाहिनला अभिषेक शर्माविरुद्ध चांगला स्पेल टाकावा लागेल.

गेल्या सामन्यात पाकिस्तानने तिसरा फिरकी गोलंदाज सुफियान मुकीम याला संधी दिली होती, पण या सामन्यात वेगवान गोलंदाज हॅरिस रौफला खेळवण्याची शक्यता आहे.

## ठळक बातम्या



### मोदी आज देशाला संबोधित करणार

**मुंबई (आरंभ पर्व) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सायंकाळी देशाला संबोधित करणार आहेत, असे वृत्त ANIने दिले आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी कोणत्या विषयावर संबोधन करणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, यापूर्वी जेव्हा जेव्हा पंतप्रधानांनी अशा प्रकारे देशाला संबोधित केले आहे, तेव्हा मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे आजच्या त्यांच्या संबोधनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या भाषणाचा विषय काय असेल याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. पंतप्रधान मोदी संध्याकाळी पाच वाजता 'राष्ट्राला उद्देशून' भाषण देतील. मात्र, मोदी जीएसटीमध्ये केलेल्या सुधारणांबाबत बोलतील असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. सोमवार, २२ सप्टेंबरपासून देशभरात जीएसटी २.० चे नवे दर लागू होणार आहेत.

### आघाडीचा निर्णय स्थानिक नेते घेणार

**पुणे (आरंभ पर्व) :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राज्यभर महाविकास आघाडी नसेल. यापुढे या निवडणुकीत महाविकास आघाडी करायची की नाही, हा निर्णय स्थानिक नेते घेतील, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले. पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे आयोजित वार्तालापात ते बोलत होते. संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले यावेळी उपस्थित होते. सपकाळ म्हणाले की, "स्थानिक निवडणुकांसाठी राज्य पातळीवर आघाडी केली जाणार नाही. प्रत्येक ठिकाणी पक्षाची स्थानिक शाखा, शहर व जिल्हा स्तरावर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, तसेच पक्षाची पुनर्बांधणी करण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय निरीक्षक नेमले जाणार आहेत."

### दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**शिरूर (आरंभ पर्व) :** व्यावसायिक कर्जासाठी जमीन गहाण ठेवूनही शिरूर तालुक्यातील शेतकऱ्याला कर्ज न देता कर्जाची सुमारे पन्नास लाख रूपयांची रक्कम परस्पर स्वतःच्या खात्यात वर्ग करून शेतकऱ्याची फसवणूक केल्याप्रकरणी पुरंदर चे माजी आमदार अशोक टेकवडे यांच्यासह दहाजणांविरूद्ध शिरूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सचिन बाळासाहेब गरूड (रा. गणेगाव दुमाला, ता. शिरूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अशोक टेकवडे यांच्यासह त्यांचा मुलगा अजिंक्य, पत्नी विजया; तसेच दिलीप नारायण वेल्हेकर, बाळासाहेब मा. काळे, दिनेश श्रीकांत घोणे, भूषण सुभाष गायकवाड, सतीश महादेव जाधव, प्रदीप दिगंबर जगताप व गणेश अंकुश जगताप (सर्व रा. हडको रोड, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे) यांच्याविरूद्ध शिरूर पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

## पुण्यात पावसाने घेतली दोन दिवसांची विश्रांती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या दोन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. तर पुढील दोन दिवस शहर आणि परिसरात हलक्या पावसाची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. शहरात शुक्रवारपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे कमाल आणि किमान तापमानात किंचित वाढ झाली आहे. शनिवारी शहर आणि परिसरात ३० अंश सेल्सिअस इतके कमाल तर २१.४ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदविण्यात आले.



पुढील दोन दिवसांत तापमानात किंचित घट नोंदविण्यात येऊन मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह अति हलक्या ते हलक्या पावसाची शक्यता असल्याचे हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.


मवारी (ता. २२) हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

## जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींची अंतिम प्रभागरचना प्रक्रियेत

### हरकती सूचनांवर सुनावणी पूर्ण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


जिल्ह्यातील नगरपरिषद आणि तीन नगरपंचायतींच्या प्रभागरचनांच्या प्रारूप आराखड्यांवरील हरकती व सूचनांची सुनावणी पूर्ण झाली आहे. त्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करून हा प्रस्ताव मान्यतेसाठी राज्याच्या नगर विकास विभागाकडे पाठविला असून, प्रभागरचना अंतिम करण्याचे काम सुरू असल्याची माहिति जिल्हा प्रशासनाने दिली. जिल्ह्यातील १४ नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रभागरचना अंतिम करण्याचे काम सुरू आहे. या प्रारूप प्रभाग रचनेवर ४१८ हरकती व सूचना आल्या होत्या. त्यापैकी नगरपरिषदांसंदर्भात २८२ आणि नगरपंचायतीसंदर्भात १३६ हरकती व सूचना आल्या होत्या. त्यावर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी ३ व ४ सप्टेंबरदरम्यान सुनावणी घेतली. दरम्यान प्रस्ताव मान्यतेसाठी नगर विकास विभागाकडे पाठविला असून, त्यानंतर या प्रस्तावाची छाननी करून तो अंतिम मान्यतेसाठी विभागीय आयुक्तांकडे जाणार आहे. विभागीय आयुक्तांच्या मान्यतेनंतरच अंतिम मोहोर उमटणार आहे.



या अंतिम प्रभागरचनेची प्रसिद्धी गॅझेटद्वारे २६ ते ३० सप्टेंबरदरम्यान होणार आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनातील नगर विकास विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी दिली. प्रारूप प्रभाग रचनेत नैसर्गिक हद्द विचारात घेतली नसल्याच्या, नदी-नाल्याच्या पलीकडे प्रभाग तयार केल्याच्या, वस्ती एकत्र न ठेवल्याच्या अशा विविध हरकती नोंदविण्यात आल्या होत्या.








# ऑनलाइन गेमिंग ! संधी की संकट?



कौशल्यावर आधारित ऑनलाइन खेळांविषयी विचार करता, हे गेम्स पूर्णपणे स्पर्धात्मक कौशल्य, अभ्यास, एकाग्रता आणि धोरणात्मक विचार यावर आधारलेले असतात. यात बुद्धीला चालना देणारे व्हिडिओ गेम्स, पझल्स, क्विझ, शैक्षणिक ॲप्स तसेच टीमवर्क वाढवणारे मल्टीप्लेयर गेम्स यांचा समावेश होतो. हे गेम्स विद्यार्थ्यांचे विषयातील ज्ञान वाढवतात, त्यांच्यातील तार्किक विचारशक्ती आणि वेगवेगळ्या विषयांच्या कौशल्याचा विकास करतात.

उदाहरणार्थ, भाषिक कौशल्यासाठी शब्दकोडी, गणिती विचारसरणीसाठी गणिती पझल्स, किंवा विज्ञान, इतिहास, भूगोल विषयांचा प्रत्यय आणून देणारे शैक्षणिक सिम्युलेशन गेम्स हे विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरतात. ते मुख्यतः मनोरंजन व शिक्षण याची सांगड घालतात. अशा गेम्समध्ये आर्थिक व्यवहार किंवा लकी ड्रॉ सारखी संधी किंवा आकर्षण नसते, त्यामुळे अपायकारक व्यसनोत्सुकता अथवा सामाजिक, आर्थिक धोके उद्भवत नाहीत.

निखळ करमणुकीसाठी विकसित ॲनिमेटेड फिल्म्स यांचे स्वरूप बऱ्याच प्रसंगी मूल्यशिक्षण, सर्जनाशी व्यक्तिमत्व विकास, कल्पनाशक्तीला वाव देणे आणि आरामदायक विरंगुळा हेच असते. ॲनिमेटेड फिल्म्स या मुलांसाठी तसेच प्रौढांसाठीही तितकेच आकर्षक माध्यम असतात. या माध्यमातून सृजनशील कथानक, गोड संगीत, रंगीत पात्रे आणि तंत्रज्ञानाचा मनोवेधक उपयोग पाहायला मिळतो.



या फिल्म्स ज्ञानवर्धनासोबत मनोरंजन, दैनंदिन जगण्याचा गोडवा, संस्कार, जीवनमूल्यांचे संदेश, सामाजिक प्रश्न यासारख्या मुद्द्यांवर सकारात्मक प्रभाव पाडतात. उदा हनुमान, महावतार नरसिंह आदी.

तिसरा प्रकार म्हणजे पैसे लावावे लागणारे जुगार किंवा बेटिंगचे खेळ. यांचे वैशिष्ट्य म्हणजे यातून निर्माण होणारा फक्त निव्वळ आर्थिक लाभ अथवा तोटा या भावनेला केंद्रस्थानी आहे. कौशल्य, शिक्षण किंवा आरोग्य या काहीच गोष्टींशी याचा थेट संबंध नसतो. पैसे किंवा मालमत्तेवर सट्टा लावून येणाऱ्या अपयश-यशाचा प्रवास हा अनेकदा नशेशिवाय, अनियंत्रित, विकृत आणि व्यसनात्मक असतो. यात लकी ड्रॉ, काईस, नंबर गेम्स, कॅसिनो गेम्स, ऑनलाइन बेटिंग प्लॅटफॉर्म्स, क्रिकेट किंवा फुटबॉलसारख्या खेळांवर फेस-टू-फेस किंवा ऑनलाइन सट्टेबाजी, अशी रूपे आहेत.

तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाइन गेमिंगचे तीन पैलू स्पष्ट दिसतात – शिक्षण व कौशल्यवर्धन, संस्कार आणि मनोरंजन देणारे ॲनिमेशन आणि व्यसनमूलक जुगार. पहिले दोन अंग समाजासाठी उपयुक्त तर तिसरे अंग विनाशकारी. त्यामुळे तरुण पिढीला योग्य वेळी मार्गदर्शन देणे ही पालक, शिक्षक आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

AVGC-XR धोरणात काय?
ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स व एक्सटेंडेड रिॲलिटीला प्रोत्साहन
कला, कौशल्य व तंत्रज्ञान यांचा संगम
रोजगार निर्मिती आणि तरुणांना संधी
सुरक्षित गेम्सचे फायदे
पझल्स व क्विझमुळे ज्ञानवृद्धी
भाषिक व गणिती कौशल्य वृद्धिंगत
टीमवर्क आणि तार्किक विचारशक्ती वाढ
जुगाराचे धोके
आर्थिक नुकसान आणि कर्जबाजारीपणा
मानसिक ताण व नातेसंबंधातील तणाव
गुन्हेगारी व व्यसनाचा धोका

आज मोबाइल हा मुलांच्या हातात सहज पोहोचतो. अशावेळी पालक आणि शिक्षकांनी मार्गदर्शन करणे अपरिहार्य आहे. कायदेशीर आणि बेकायदेशीर खेळांमधील फरक मुलांना समजावून सांगणे गरजेचे आहे.

सुरक्षित, शिक्षणपूरक गेम्स निवडून देणे, तसेच मैदानावरील खेळ, वाचन, कला व छंद याकडे वळवणे आवश्यक आहे. पालक स्वतः मोबाइल व्यसनात अडकले तर मुलांकडून आदर्श वर्तनाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. शाळा-महाविद्यालयांत नागरिकशास्त्र विषयात ऑनलाइन व्यसनाचे दुष्परिणाम शिकवले गेले पाहिजेत.

हे खेळ सुरुवातीला चित्तथरारक, मोहक आणि 'लवकर श्रीमंत होण्याचा' हव्यास निर्माण करणारे असले तरी पुढे जाऊन आर्थिक नुकसान, मानसिक आरोग्याच्या समस्या, सामाजिक आणि कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव आणि अनेकदा गुन्हेगारी जन्मास घालतात. यामुळेच यावर कायद्याने बंदी आहे.

# पुणे-सोलापूर महामार्गावरील अभूतपूर्व वाहतूक कोंडी : जबाबदार कोण?



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

शनिवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीन वाजल्यानंतर पुणे-सोलापूर महामार्गावर झालेली वाहतूक कोंडी न भूतो न भविष्यती ठरली. तब्बल तीन ते साडेतीन तास महामार्गावर शेकडो वाहने अडकून पडली. या कोंडीत रुग्णवाहिका, शाळेच्या बस, एसटी बस, कामगारांच्या गाड्या, शेतकऱ्यांची वाहने आणि खासगी प्रवासी सर्वच अडकून नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली.

**कोंडीचे मूळ कारण :** कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीकडून मधुबन कार्यालयासमोरील वाकलेला हाय-मॅस्ट खांब काढण्याचे काम वाहतूक पोलिसांची परवानगी न घेता सुरू करण्यात आले. या कामासाठी आणलेल्या मोठ्या क्रेनमुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. खांब काढल्यानंतर तोच रस्त्याच्या डिव्हायडरलगत ठेवण्यात आल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली.

**ग्रामपंचायतीवर प्रश्नचिन्ह :** घटनेबाबत कदमवाकवस्तीचे ग्रामसेवक अमोल घोळवे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला; मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. नागरिकांमध्ये चर्चा होती की, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी परवानगी घेऊनच काम केले का? वेळ योग्य निवडली का?

वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांनी मिळून प्रयत्न केले.

यावेळी काही ठिकाणी वाहतूक वार्डन आणि नागरिकांमध्ये किरकोळ चकमकी झाल्याची माहितीही समोर आली.

मराठा महासंघाचे गजानन जगताप यांनी सांगितले, "आतापर्यंतची सर्वात भीषण कोंडी यावेळी झाली. जबाबदारांवर तातडीने कारवाई केली जावी."

हडपसर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट व त्यांच्या टीमने परिस्थिती हाताळण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कामाला लावली. त्यांना लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, उपनिरीक्षक उदय काळभोर आणि पोलीस दलाची मदत मिळाली. काही तासांच्या प्रयत्नांनंतर वाहतूक हळूहळू मार्गी लागली.

मनसेचे हवेली तालुका अध्यक्ष अनिरुद्ध मराठे यांनी या कामगिरीबद्दल पोलिसांचे अभिनंदन केले.

एका हाय-मॅस्ट खांबामुळे पुणे-सोलापूर महामार्गावरील हजारो नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. वेळ न बघता आणि परवानगी न घेता केलेल्या कामामुळे झालेल्या या कोंडीस जबाबदार कोण, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. नागरिक मात्र दोषींवर कारवाईची मागणी करत आहेत.

## पोलिसांचा खुलासा

**हडपसर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट यांनी सांगितले – ग्रामपंचायतीने कोणतीही परवानगी घेतलेली नव्हती. वाहतूक कोंडीदरम्यान अनेक वाहने उलट्या दिशेने येऊ लागली, त्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली.**

## नागरिकांचे हाल

- **लोणी काळभोरपासून १५ नंबरपर्यंत सोलापूरकडे जाणाऱ्या वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या.**
- **पुण्याकडे जाणारी वाहने मधुबन कार्यालयापासून कुंजीरवाडीपर्यंत लांबच लांब थांबली.**
- **नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली.**
- **"एका खांबामुळे एवढी मोठी कोंडी? यासाठी जबाबदार कोण?" असा सवाल चर्चेत होता.**
- **शनिवार सुट्टी असल्यामुळे प्रवाशांची संख्या जास्त होती, परिणामी अडचणी अधिक वाढल्या.**

# पितृपक्षानिमित्त श्रुफिन वेलफेअर फाउंडेशनतर्फे अन्नदान उपक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पितृपक्षात अन्नदान करणे हे शुभ मानले जाते. कावळ्याला खाऊ घालण्याची परंपरा आहेच, मात्र गरजू, अनाथ मुले आणि वृद्धांसाठी अन्नदान करणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. "अन्नदान हेच श्रेष्ठ दान" या भावनेतून श्रुफिन वेलफेअर फाउंडेशनतर्फे शांतिबन वृद्धाश्रमात अन्नदान करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन सविता रासोटे यांनी केले. कै. नारायणराव नवले शाळेतील सकाळ व दुपार सत्रातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, विविध शाळांचे मुख्याध्यापक तसेच नातेवाईक, मित्रपरिवार यांच्या मदतीने वृद्धाश्रमात अन्नदान करण्यात आले. यावेळी वृद्धाश्रमातील आजी-आजोबांबरोबर वेळ घालवण्यात आला, त्यांच्यासोबत खेळ खेळून त्यांचे मनोरंजन करण्यात आले. त्यांच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद अनमोल होता. मोठ्यांचा आदर करणे व त्यांची काळजी घेणे ही काळाची गरज आहे, अशी शिकवण मुलांना देण्याचा उद्देश या उपक्रमातून साधला गेला. या कार्यक्रमाला शांतिबनच्या अनिता देवकर मॅडम, श्रुती रासोटे, वैजयंती शिंदे तसेच पालक व शिक्षक उपस्थित होते.

# डीपी रोडचे काम तात्काळ सुरू करा

- **अन्यथा मनसे स्टाईलने उत्तर देऊ – खडकवासला मनसेचा इशारा**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या 28 वर्षांपासून धायरी परिसरातील नागरिकांना डीपी रोडची अपेक्षा आहे. मात्र प्रत्यक्षात काम झालेले नाही. अडीच कोटी रुपये खर्च दाखवूनही रस्ता फक्त कागदावर आहे, प्रत्यक्षात नाहीच, असा गंभीर आरोप मनसे वाहतूक सेना शहराध्यक्ष शिवाजी मते यांनी केला आहे. त्यामुळे धायरी व परिसरातील जनतेत प्रचंड नाराजी आहे.

या प्रश्नाबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ठाम भूमिका घेतली असून "डीपी रोडचे काम तातडीने सुरू झाले नाही, तर मनसे स्टाईलने उत्तर दिले जाईल" असा इशारा मनसेने दिला आहे.

यावेळी विविध संदेश असलेली पोस्टर्स दाखवून नागरिकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. तसेच खा. सुप्रिया सुळे व आयुक्त नवल रामकिशोर यांना संयुक्त निवेदन देण्यात आले. आज पाहणी दौऱ्यामध्ये मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार सुळे व आयुक्त नवल रामकिशोर यांचे स्वागत केले व धायरीच्या अस्मितेचा प्रश्न आपण सोडवावा अशी विनंती केली.

यावेळी मनसे वाहतुक सेना शहराध्यक्ष शिवाजी मते म्हणाले की धायरी ची वाहतूक कोंडी कमी करायचे असेल तर हा डीपी रोड होणे गरजेचे आहे. मात्र त्याकडे सर्रासपणे दुर्लक्ष होत असल्याचे जाणवत आहे.

त्यामुळे हा प्रश्न सुटणे गरजेचे आहे. अन्यथा मनसे स्टाईलने उत्तर देणार आहोत . खडकवासला अध्यक्ष विजय मते म्हणाले , डीपी रोड साठी मनसे आक्रमकपणे आग्रही राहणार आहे. प्रशासनाने आता बोध घेऊन तात्काळ कार्यवाही करावी. व नागरिकांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न सोडवावा..

या कार्यक्रमाला मनसेचे वाहतूक सेना शहराध्यक्ष शिवाजी मते, खडकवासला विभाग अध्यक्ष विजय मते शहर सचिव सोनाली पोकळे, उप विभाग अध्यक्ष आकाश साळुंखे, महेश महाले, बाळासाहेब मांडलिक, सिद्धार्थ पोकळे, प्रशांत पवार आदी उपस्थित होते.






# धायरी-शिवणे मंडलाततर्फे सेवा पंधरवडा शिबिर यशस्वीरित्या संपन्न

## रुपेश घुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत देशभर सेवा पंधरवडा अभियान राबवले जात आहे. याच अंतर्गत धायरी-शिवणे (दक्षिण) विभागात विविध समाजोपयोगी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे संपूर्ण नेतृत्व व व्यवस्थापन मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी केले.

२० सप्टेंबर रोजी श्री गणेश मंगल कार्यालय, नांदेड फाटा, सिंहगड रोड येथे सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत पार पडलेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे व खडकवासल्याचे आमदार भीमराव (अण्णा) तापकीर यांच्या हस्ते करण्यात आले.

शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी रुपेश घुले पाटील यांच्या कार्याची स्तुती करत म्हटले, "त्यांच्या नेतृत्वामुळे नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि हा उपक्रम यशस्वी झाला."

आमदार तापकीर यांनीही रुपेश घुले पाटील यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महिलांनी मोफत आरोग्य तपासणीचा मोठा लाभ घेतला. उपस्थित नागरिकांनी आयोजक रुपेश घुले पाटील यांचे आभार मानत, "आमचे आरोग्यदूत आहेत" असे कौतुक केले.

या उपक्रमासाठी शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, धायरी वडगाव मंडळ अध्यक्ष यशवंत लायगुडे ,महिला अध्यक्षा रश्मी घुले पाटील, गंगाधरजी भडावळे, दत्ताभाऊ कोल्हे, सचिन दांगट, बापूसाहेब पोकळे, अनिल मते, रमेश गायकवाड, अभिजित धावडे, उमेश सरपाटील, मनीषाताई मोरे, जयश्रीताई पोकळे, अशोक मते, विशाल कदम, तेज हुलावळे, किशोर पोकळे, निखील धावडे, किरण हगवणे, यशवंत लायगुडे, आकाश शेठ शिंदे, गणेश वांजळे, अजित कारले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. साथीचा कार्यभार संयोजक हेमेंद्र जोशी, सहसंयोजक अजित कारले व किरण हगवणे, आणि सोशल मीडिया प्रमुख गिरीश वसेकर यांनी घेतला.

## शिबिरांतर्गत सेवा

- **एच. व्ही. देसाई नेत्ररुग्णालय, पुणे – मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया**
- **माय मेडीपॅथ डायग्नॉस्टिक, पुणे – सवलतीच्या दरात रक्त तपासणी**
- **ई-श्रम कार्ड, आयुष्यमान कार्ड, आधारकार्ड दुरुस्ती, HSRP वाहन नंबर प्लेट शिबिर**
- **स्थानिक उद्योजकांच्या वस्तूंचे 'वोकल फॉर लोकल' प्रदर्शन व विक्री**

## थोडक्यात पण महत्वाचे



### नांदेड सिटीमध्ये मंदिर स्वच्छता मोहिमेने सेवा पंधरवड्याला सुरुवात

**पुणे (आरंभ पर्व) : भारताचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त देशभर सेवा पंधरवडा अभियान सुरू झाले आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री भीमराव अण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाची सुरुवात नांदेड सिटी येथे करण्यात आली. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता नांदेड गावातील श्री लक्ष्मी नारायण मंदिर (ग्रामपंचायत कार्यालयामागे) येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मंदिराचा प्रत्येक कोपरा आणि परिसर स्वच्छ करून मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी भारतीय जनता पक्ष खडकवासला मतदारसंघाचे मंडल अध्यक्ष श्री रुपेश घुले पाटील, श्री हेमेंद्र जोशी व श्री अजित कारले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी नरेंद्र मोदींना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो, अशी प्रार्थना केली. स्वच्छता मोहिमेत मंडल अध्यक्ष श्री रुपेश घुले (पाटील), सौ. रश्मी रुपेश घुले, श्री सुजित कारले, श्री अजित कारले, श्री नरसिंह देशमुख, श्री हेमेंद्र जोशी, श्री गिरीश वसेकर, श्री महेश बजाज, श्री विशाल कदम तसेच नांदेड गावातील अनेक कार्यकर्ते सहभागी झाले. उत्साहात ही मोहीम पार पडली.संध्याकाळी ग्रामदेवी श्री वडजाई माता मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले. भक्तिभावाने पूजा व आरती पार पडली असून भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. या सेवा पंधरवड्याचे नियोजन व समन्वयाची जबाबदारी मंडल अध्यक्ष श्री रुपेश घुले पाटील, संयोजक श्री हेमेंद्र जोशी, सहसंयोजक श्री अजित कारले व श्री किरण हगवणे तर सोशल मीडिया प्रमुख म्हणून श्री गिरीश वसेकर हे पाहत आहेत.**

### एअरलाईन्स आणि संबंधित यंत्रणांकडून प्रवासी सुरक्षेकडे गंभीर दुर्लक्ष



**पुणे (आरंभ पर्व) : गोवा ते पुणे या स्पाइसजेटच्या फ्लाइट (SG1080) मधील प्रवासादरम्यान एक धक्कादायक घटना घडली. पुण्यातील व्यावसायिक अभिजीत भोसले यांना क्रू मेंबरकडून दिलेल्या डाएट कोकच्या कॅनमध्ये धातूचे तीक्ष्ण तुकडे आढळले. या तुकड्यांमुळे त्यांच्या घशाला इजा झाली आणि त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र या संपूर्ण प्रकरणाबाबत स्पाइसजेट, कोका-कोला सह संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाला गांभीर्याने न घेतल्याची खंत अभिजीत भोसले यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. पत्रकार परिषदेत बोलताना भोसले म्हणाले, "मी विमान प्रवासादरम्यान सॉफ्ट ड्रिंक घेतले. काही घोट घेतल्यानंतर घशात तीव्र वेदना जाणवू लागली व श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. माझे सहप्रवासी महेश गुप्ता आणि राजकुमार अगरवाल यांनी मला मदत केली. पुण्यात उतरल्यावर एअरलाईनने तातडीने रुग्णवाहिका बोलावली आणि मला रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.**



### सिंहगड रोड येथे स्वच्छता मोहीम

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उत्साहात उपक्रम**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड परिसरामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. स्वच्छ भारत अभियानाच्या संकल्पनेला अनुसरून हा उपक्रम घेण्यात आला. खडकवासल्याचे लोकप्रिय आमदार भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली व मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे यांच्या नेतृत्वाखाली सकाळपासूनच कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांनी स्वच्छतेत सहभाग नोंदवला. या मोहिमेत मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, माजी नगरसेवक श्रीकांत जगताप, सौ. श्रावणी जगताप, भाजप मंडल सरचिटणीस सचिन मनेरे, आरोग्य निरीक्षक धनंजय पोकळे यांच्यासह स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला. यामुळे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली असून, पुढील काळातही नियमितपणे असे उपक्र राबवण्यात येतील**
**- यशवंत लायगुडे**
**मंडल अध्यक्ष भाजपा**

स्थानिक नागरिक देखील या स्वच्छता मोहिमेत स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले. कार्यकर्त्यांनी रस्त्यांवरील कचरा, प्लास्टिक व इतर घाण साफ करून परिसर स्वच्छ करण्याचे काम केले. स्वच्छ भारत हेच खरे राष्ट्रसेवेचे कार्य या भावनेतून सर्वजण उत्साहाने झाडू हातात घेऊन कामाला लागले होते.









# वारजे डुक्करखिंड–तिरुपतीनगर डीपी रस्ता लवकरच मार्गी लागणार?

## सुप्रिया सुळे व आयुक्तांची पाहणी

## इथेही माणसे राहतात त्यांचा विचार करा; सचिन दोडके यांची प्रशासनाला विनंती

**वारजे (दै. आरंभ पर्व)**

वारजे येथील डुक्करखिंड ते तिरुपतीनगर दरम्यानचा २४ मीटर रुंद डीपी रस्ता तयार व्हावा, अशी स्थानिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. कात्रज–देहूरोड बाह्यवळण महामार्गावरून कर्वेनगर, कोथरूड, एरंडवणा भागात जाण्यासाठी तसेच वारजे सर्व्हिस रस्त्याला पर्यायी मार्ग ठरणाऱ्या या रस्त्याचे काम वनविभागाच्या हद्दीतील हरकतीमुळे दीर्घकाळ प्रलंबित आहे.





या विषयाच्या अनुषंगाने बारामती लोकसभा मतदारसंघाच्या संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, तसेच वन विभागाचे अधिकारी यांनी वारजेतील सिप्ला हॉस्पिटलच्या पाठीमागील भागातील रस्त्याची पाहणी केली.

या प्रश्नाच्या पाठपुराव्यासाठी माजी नगरसेवक सचिन दोडके यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. सचिन दोडके हे या रस्त्याच्या कामासाठी सातत्याने आवाज उठवत असून, त्यांनीच आयुक्तांना प्रत्यक्ष पाहणीस आणण्यात पुढाकार घेतला. स्थानिकांनाही त्यांच्याकडून सातत्याने मदत मिळत आहे.

यावेळी स्थानिक नागरिकांनी आयुक्तांना वस्तुस्थिती सविस्तर सांगितली. तसेच वन विभाग आणि महापालिका यांच्यात समन्वय साधून लवकरात लवकर या प्रश्नावर तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली.

आयुक्तांनी पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत सर्व संबंधित विभागांची बैठक घेऊन उपाय शोधण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे लवकरच या समस्येवर तोडगा निघेल, अशी आशा व्यक्त होत आहे.




# पुणेकरांना पाहायला मिळणार लंडन ब्रिज आणि युरोपियन स्ट्रीट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डी.जे. अम्युजमेंट प्रस्तुत, महाराष्ट्रात प्रथमच पुणेकरांसाठी लंडन ब्रिज आणि युरोपियन स्ट्रीटचे एक्झिबिशन आयोजित करण्यात आले आहे. दरवर्षी नवनवीन संकल्पना घेऊन येणाऱ्या या प्रदर्शनात यंदा लंडनचा ब्रिज आणि युरोपियन स्ट्रीटची हुबेहूब प्रतिकृती उभारण्यात आली आहे. यामुळे पुणेकरांना लंडन ब्रिजवरून चालत जाण्याचा अनुभव घेता येणार आहे.हे एक्झिबिशन शिवगीरक्ष ग्राउंड, कात्रज-कोंढवा रोड, पुणे येथे भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता नगरसेवक प्रकाशभाऊ कदम यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या



उपस्थितीत सोहळा पार पडणार आहे, अशी माहिती आयोजक जयप्रकाश, जयराज आणि वी. नापर यांनी दिली. प्रदर्शनात आकर्षक विद्युत रोषणाईच्या माध्यमातून युरोपियन सिटी उभारण्यात आली आहे. लहान मुलांपासून ते सर्व वयोगटातील लोकांसाठी मनोरंजनाची रेलचेल आहे. जायंट व्हील, कोलंबस, ड्रॅगन ट्रेन, ब्रेक डान्स, मोठा पाळणा अशा थरारक राईड्ससोबतच मुलांसाठी पेडल बोट, जंपिंग, मिनी ट्रेन यांसारख्या खास राईड्सची सोय आहे.

# निलंगा तालुका काँग्रेस कमिटी कार्यालयात ध्वजारोहण सोहळा उत्साहात





**निलंगा (दै. आरंभ पर्व)**

निलंगा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने निलंगा येथील अशोक बंगला येथे असलेल्या तालुका काँग्रेस कमिटी कार्यालयात ध्वजारोहणाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते सिद्धू आवले यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला.

सोहळ्याला निलंगा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय काँग्रेस नेते तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष मा. श्री. अशोक शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब विशेष उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर झालेल्या कार्यक्रमात काँग्रेस पक्षाच्या सामाजिक बांधिलकीवर व लोकशाही सुदृढ करण्यातील योगदानावर प्रकाश टाकण्यात आला.

यावेळी मान्यवर म्हणून माजी सभापती मोहम्मद पठाण, माजी सभापती अशोकाप्पा शेटकर, जि.म.स. बँकेचे व्यवस्थापक व्यंकटराव शिंदे, माजी सभापती दिलीप फुलसुरे, माजी नगरसेवक सुधीर लखनगावे, काँग्रेस कमिटी लातूरचे उपाध्यक्ष सोनाजी कदम, श्रीधर झरकर, सरपंच दापका लाला पटेल, महेश आप्पा चिक्राळे, गोविंद उसनाळे, व्यंकटराव साळुंके, शिवाजी चव्हाण, पांडुरंग बिरादार, अनिल अग्रवाल, पाखर सांगवे, बालाजी मुगळे, बालाजी मोरे, बाबुराव सोमवंशी, प्रमोद ढेरे, विक्रांत सूर्यवंशी, देविदास जाधव, बबलू जाधव, अर्जुन जाधव, भागवत बिराजदार, राहुल घोडके, बबर पठाण, पत्रकार मोहन क्षीरसागर, सोहेल शेख, महादेव झरकर, विलास बोळे, खलील शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

ध्वजारोहण प्रसंगी काँग्रेस कार्यकर्ते, युवक काँग्रेस कार्यकर्ते, NSUI कार्यकर्ते, पदाधिकारी, पत्रकार बांधव, सुजाण नागरिक आणि युवक मित्र यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे वातावरण देशभक्तीपर घोषणांनी दुमदुमून गेले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पुण्यात नॅन्डोजचे आगमन : फिनिक्स मार्केटसिटीत ‘पेरी-पेरी’चा धमाका

**पुणे (आरंभ पर्व) :** आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेला फ्लेम-ग्रील्ड पेरी-पेरी चिकन ब्रँड "नॅन्डोज" आता पुण्यात दाखल झाला आहे. विमाननगर येथील फिनिक्स मार्केटसिटी मॉलमध्ये पुण्याचे पहिले "कासा" (रेस्टॉरंट – ज्याचा पोर्तुगीज भाषेत अर्थ घर) सुरू करत नॅन्डोजने आपल्या चाहत्यांना चविष्ट सरप्राईज दिले आहे. दक्षिण आफ्रिकेत जन्मलेला हा ब्रँड आज जगभरात आपल्या खास पेरी-पेरी फ्लेवर्ससाठी ओळखला जातो. दिल्ली, बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, पंजाब आणि मुंबईनंतर आता पुणेकरांसाठी ही ‘फ्लेवर पार्टी’ उघडली आहे. नॅन्डोज इंडिया चे सीईओ समीर भसीन म्हणाले – “पुणे हे संस्कृती, सर्जनशीलता आणि अन्नप्रेम यासाठी ओळखले जाते. पुणेकरांचा उत्साह आम्ही अनेक शहरांतून अनुभवला आहे आणि आता आम्ही त्यांना हवी असलेली धाडसी, अविस्मरणीय पेरी-पेरी चव देण्यासाठी सज्ज आहोत. फिनिक्स मार्केटसिटी हे यासाठी योग्य ठिकाण आहे.”

### वारजे परिसरात खाऊ वाटप



**वारजे, पुणे (आरंभ पर्व) :** देशाचे पंतप्रधान आणि जागतिक पातळीवर लोकप्रिय नेते नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त वारजे परिसरात भव्य समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत भाजपा चित्रपट आघाडी पुणे शहराध्यक्ष राजीव पाटील यांच्या पुढाकाराने वारजेतील तब्बल २५ अंगणवाड्यांमधील शेकडो लहानग्यांना विविध प्रकारचे खाऊ वाटप करण्यात आले. लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटताना संपूर्ण वातावरणच आनंदी झाले. पालकांनी व अंगणवाडी सेविकांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले. समाजातील लहानग्यांप्रती आपुलकी, प्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांचा उत्तम संगम या उपक्रमातून दिसून आला. या कार्यक्रमास भाजपा खडकवासला सरचिटणीस चेतन गोंडाळ, राकेश सावंत, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्वांनी या उपक्रमाचे कौतुक करून असे उपक्रम समाजात सकारात्मक संदेश देणारे असल्याचे मत व्यक्त केले. राजीव पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले की, “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यप्रेरणेने समाजोपयोगी कार्यक्रम राबवणे ही आपली जबाबदारी आहे. मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून खऱ्या अर्थाने वाढदिवस साजरा झाल्याचा समाधान मिळाले.” वारजे परिसरातील हा खाऊ वाटप उपक्रम केवळ एक सामाजिक कार्य न राहता लहानग्यांच्या मनात आनंदाचा सण साजरा करण्याचा सोहळा ठरला.

# पंतप्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त हिंगणे खुर्दमध्ये स्वच्छता मोहीम

*ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवार स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त हिंगणे खुर्द परिसरात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

पुण्याचे माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी मित्र परिवारासह या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग नोंदवला.



या मोहिमेत विठ्ठल मंदिर परिसर, विठ्ठलवाडी कमान रोड आणि नदीपात्र पायरी रोड येथे मोठ्या उत्साहात स्वच्छता करण्यात आली. काल झालेल्या पावसामुळे पडलेली झाडे व कचरा हटवून परिसर अधिक स्वच्छ व आकर्षक करण्यात आला.

या उपक्रमात विठ्ठलवाडी गोसावी शाळेतील विद्यार्थी, पुणे महानगरपालिकेचे कर्मचारी तसेच ॲड. प्रसन्नदादा जगताप व त्यांचा मित्र परिवार यांनी सहभाग घेतला. समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन राबविलेली ही कृती खऱ्या अर्थाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दिलेली प्रेरणादायी वाढदिवस भेट ठरली.

माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पुढाकारामुळे उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला. स्वच्छता मोहिमेच्या या कार्याचे परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर कौतुक केले.




# १० हजार बहिणींना प्रशिक्षण देणार : हरिदास चरवड

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १० हजार महिलांना चारचाकी प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ !!

- **हरिदास चरवड यांनी केलेला उपक्रम प्रेरणादायी मी त्यांच्या पाठीशी; आ. तापकीर**





**पुणे (लक्ष्मण साबळे) (दै. आरंभ पर्व)**

वडगाव, नऱ्हे व धायरी परिसरामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी भव्य चारचाकी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत तब्बल १० हजार महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिलांच्या सबलीकरणासाठी आणि स्वावलंबनासाठी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी खडकवासल्याचे आमदार भीमराव अण्णा तापकीर, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, मंडल सरचिटणीस शहाजी वांजळे, भाजप युवा मोर्चाचे माजी अध्यक्ष सारंग नवले, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, माजी उपसरपंच सागर भूमकर, शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, रमेश गायकवाड, चंद्रकांत पोवळे, केदार नाना जाधव, संग्राम पवार, सुरेश कोळेकर, सुदाम कोळेकर, संजीवनी मुंदडा, साई यात्रा प्रतिष्ठानच्या सौ. पूनमताई चरवड, नंदकिशोर गोसावी, अनंता कांबळे, शर्वरी पाचलग, मनाली पुराणिक, दिग्विजय चरवड, विश्वजीत चरवड, श्रीसाई पवार, यश चरवड, उन्मेश निजामपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आयोजक नगरसेवक हरिदास चरवड म्हणाले, “वडगाव, नऱ्हे, धायरी भागातील लाडक्या बहिणींसाठी वाहन चालविण्यासाठी हे शिबिर आयोजित केले आहे. दहा हजार महिला भगिनींनी याचा लाभ घ्यावा. हे प्रशिक्षण शिबिर तीन महिने चालणार असून सर्वांनी यात सहभागी व्हावे.”

यावेळी आमदार भीमराव अण्णा तापकीर म्हणाले, “लाडक्या बहिणींसाठी हरिदास चरवड यांनी राबवलेला उपक्रम स्तुत्य आहे. मी त्यांच्या नेहमी पाठीशी आहे. महिलांच्या सबलीकरणासाठी हा उपक्रम निश्चितच मोलाचा ठरेल.”

या शिबिरामुळे महिलांना वाहन चालविण्याबरोबरच आत्मविश्वास, स्वावलंबन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, अशी भावना मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमाला परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सिंह घेतले दत्तक

पुणे (आरंभ पर्व) : "सिंह हा जंगलाचा राजा आहे आणि भारतही लवकरच जगाचा राजा होईल" या भावनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला. पुण्यातील कात्रज प्राणी संग्रहालयातील सिंहांना सर्वात्मक महारुद्र परिवार ट्रस्ट तर्फे दत्तक घेण्यात आले आहे. याअंतर्गत एक महिन्याचा खाणे, पिणे व औषधोपचाराचा संपूर्ण खर्च ट्रस्ट उचलणार आहे. ट्रस्टचे मार्गदर्शक गुरुवर्य प्रकाश शिंदे यांनी सांगितले की, "वाढदिवसानिमित्त फक्त फ्लेक्स, आतषबाजी वा दिखाव्यावर खर्च करण्यापेक्षा प्रत्यक्ष समाजोपयोगी कामातून आनंद साजरा करणे ही खरी सेवा आहे. त्यामुळे आम्ही सिंह दत्तक घेण्याचा संकल्प केला." या उपक्रमासाठी कात्रज उद्यानाचे संचालक राजकुमार जाधव यांनी विशेष सहकार्य केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पुण्यात अशा पद्धतीचा आगळावेगळा उपक्रम राबवल्याबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### भारतीय जनता पार्टी सरचिटणीस पदी बापूसाहेब पोकळे पाटील यांची निवड



पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी धायरी-शिवणे मंडळाची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. मंडळाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी कार्यकारिणी जाहीर करताना धायरीतील युवा नेते बापूसाहेब पोकळे पाटील यांच्याकडे खडकवासला मतदारसंघ सरचिटणीस पदाची धुरा सोपवण्यात आली. अध्यक्ष धीरज घाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते पोकळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. बापूसाहेब पोकळे हे धायरी-शिवणे परिसरातील तडफदार युवा नेतृत्व असून त्यांनी नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्येही त्यांनी जबाबदारी पार पाडत पक्षाची ताकद वाढवली आहे. त्यांच्या याच योगदानामुळे त्यांना पुन्हा सरचिटणीस पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीबद्दल शहराध्यक्ष धीरज घाटे व आमदार भीमराव (अण्णा) तापकीर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना बापूसाहेब पोकळे यांनी म्हटले की, "भारतीय जनता पार्टीसाठी व पदाधिकाऱ्यांसाठी मी नेहमीच कार्यरत राहीन. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीला अनुसरून आगामी काळात जनतेसाठी सक्रियपणे काम करत राहणार आहे." त्यांच्या या निवडीबद्दल कार्यकर्ते व नागरिकांच्या वतीने कौतुकाचा वर्षाव होत आहे.






# निवडणुकीसाठी सज्ज रहा : साईनाथ बाबर

## खडकवासला मतदारसंघात महापालिका निवडणुकीसाठी मनसेची आढावा बैठक संपन्न!



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे प्रतिपादन शहर अध्यक्ष साईनाथ बाबर यांनी व्यक्त केले.

खडकवासला मतदारसंघात महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी धायरीतील मनसे नेते शिवाजीराव मते यांच्या जनसंपर्क कार्यालयात आढावा बैठक संपन्न झाली.

शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी प्रभागातील इच्छुक आणि मतदार यादीवर काम करणाऱ्या प्रतिनिधींना नेमण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

बैठकीत खडकवासला मतदारसंघाचे अध्यक्ष विजय मते यांनी आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे, मतदारांपर्यंत पोहोचावे आणि जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यावर लक्ष केंद्रित करावे असे मार्गदर्शन केले.

यावेळी वाहतूक सेनेचे शिवाजीराव मते यांनी संघटनात्मक बांधणी कडे लक्ष वेधले. प्रत्येकाने प्रत्येक मतदारापर्यंत पोचून राज साहेबांचा विचार घरोघरी पोहोचवण्याची गरज निर्माण असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी खडकवासला विधानसभा अध्यक्ष विजय मते, वाहतुक सेना शहराध्यक्ष शिवाजीराव मते, शहर सचिव सोनाली पोकळे, चंद्रकांत गोगाले, गौरव दांगट, नितीन वांजळे, आकाश साळुंखे, गणेश सुर्यवंशी, विजय इंगळे, सिद्धार्थ पोकळे, बाळासाहेब हाणमघर, राहुल वाळुंजकर, अभिजीत देशमुख, रियाज शेख, गणेश धुमाळ, समीर वेदपाठक, वैभव जाधव, सतीश कोळेकर, प्रशांत पवार, सचिन कोरे, बाळासाहेब मंडलिक, नयन धोत्रे, हर्षल रायकर, स्वप्नील नांगरे, राज बडदे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत प्रभागातील कामकाजाचे नियोजन, कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवण्याचे आणि आगामी निवडणुकीसाठी रणनीती आखण्याचे मुद्दे चर्चिले गेले.

सर्व उपस्थितांनी नागरिकांशी सतत संवाद साधून पक्षाच्या उद्दिष्टांची माहिती देणे आणि मतदारसंघात सक्रिय उपस्थिती राखणे आवश्यक असल्याचे मान्य केले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे जो निर्णय घेतील त्याप्रमाणे आपण सर्वांनी सज्ज व्हावे व आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी सर्वांनी प्रयत्न करावे असेही मत साईनाथ बाबर यांनी यावेळी व्यक्त केले.



### धनश्रीताई कोल्हे यांची भारतीय जनता पार्टी सरचिटणीस पदी निवड

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**


भारतीय जनता पार्टीच्या धायरी-शिवणे मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, सरचिटणीस पदी कोल्हेवाडी येथील सौ.धनश्री दत्ताभाऊ कोल्हे यांची निवड करण्यात आली आहे. ही कार्यकारिणी धायरी शिवणे मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी जाहीर केली. सौ. धनश्री दत्ताभाऊ कोल्हे यांच्याकडे सरचिटणीस पदाची धुरा सोपवण्यात आली आहे. त्या यापूर्वी महिला आघाडीच्या उपाध्यक्ष म्हणून काम करत होत्या आणि या भागातील महिलांसाठी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. पक्षाच्या विविध कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग नेहमी दिसून येतो. या निवडीबद्दल शहराध्यक्ष धीरज काटे आणि आमदार भीमराव तापकीर यांनी त्यांचे अभिनंदन केले व आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

धनश्री कोल्हे यांनी या निवडीबद्दल बोलताना सांगितले की, "नेमणुकीबाबत मी पक्षाची आभारी आहे आणि आगामी काळात निश्चितपणे भारतीय जनता पार्टीसाठी योगदान देणार आहे. कोल्हे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## वंचित मुलांना शूज व कपड्यांचे वाटप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कॉर्पोरेट जबाबदारी आणि सामाजिक उत्तरदायित्व जपत प्युअर या संस्थेने डेटा इकॉनॉमीच्या सहकार्याने सणासुदीच्या पार्श्वभूमीवर विशेष सीएसआर उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत येरवडा येथील घर – संत ईश्वर फाउंडेशन मधील वंचित व अनाथ मुलांसोबत सण साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्युअर व डेटा इकॉनॉमीच्या टीमने मुलांशी आत्मीय संवाद साधत त्यांना नवीन शूज व कपडे भेट दिले. या उपक्रमामुळे मुलांचा आनंद द्विगुणित झाला. या कार्यक्रमाला प्युअरच्या CEO डॉ. शैला तल्लुरी व व्यवस्थापकीय




विश्वस्त श्रीमती संध्या उपस्थित होत्या. त्यांनी नमूद केले की, कॉर्पोरेट आणि गैर-सरकारी संस्थांतील भागीदारीमुळे समाजात खऱ्या अर्थाने सकारात्मक व अर्थपूर्ण बदल घडवता येतो.

## युवा मोर्चा पश्चिम अध्यक्षपदी निखिल धावडे यांची फेरनिवड

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

भाजयु (भाजपा युवा मोर्चा) पश्चिम मंडलअध्यक्षपदी निखिल लक्ष्मण धावडे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. अत्यंत कमी वयात राजकीय क्षेत्रात प्रावीण्य मिळवणारे निखिल धावडे, आमदार मा. भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ पक्षसंघटनात सक्रिय आहेत.

नुकतेच शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या प्रसंगी आमदार



भीमराव तापकीर, शहराध्यक्ष धीरज घाटे, शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील, प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

कै. सुरेश दत्तात्रय धावडे (मा. चेअरमन), भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते, यांच्या मार्गदर्शनाखाली निखिल धावडे यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. त्यांच्या कार्यक्षमतेमुळे कोंडवे धावडे गावचे उपसरपंच पद त्यांनी भूषवले. भारतीय जनता पार्टीसाठी त्यांचे योगदान मोठे असून, होऊ घातलेल्या पुणे महानगरपालिकेसाठीही त्यांची दावेदारी प्रबळ मानली जाते.

युवकांमध्ये लोकप्रिय आणि कार्यतत्पर नेता म्हणून ओळख असलेले निखिल धावडे, भारतीय जनता पार्टी जनसेवा कार्यालयाच्या माध्यमातून विविध सामाजिक व जनकल्याणात्मक कामे करत आहेत. रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना सेवा प्रदान करणे ही त्यांची विशेष ओळख आहे.

या निवडीबद्दल बोलताना निखिल धावडे यांनी आमदार भीमराव तापकीर, शहराध्यक्ष धीरज घाटे आणि रुपेश घुले यांचे आभार मानले. त्यांनी भविष्यात भारतीय जनता पार्टीसाठी अविरतपणे काम करण्याचा निश्चय व्यक्त केला.

## जवळगाव तुळजाभवानी मंदिरात नवरात्रोत्सवाची सुरुवात

*तुळजाभवानी सामाजिक व बहुउद्देशीय संस्थेतर्फे नवरात्र महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन; नागेश चव्हाण*

**बार्शी (दै. आरंभ पर्व) :**

बार्शी तालुक्यातील जवळगाव येथील ऐतिहासिक तुळजाभवानी (अंबाबाई) मंदिरात सोमवार, दि. २२ सप्टेंबरपासून शारदीय नवरात्रोत्सवाची सुरुवात झाली आहे. तब्बल ९५ वर्षांपूर्वी अंबादास कापसे यांनी गुरे राकताना देवीचे दर्शन घेतले व त्यानंतर येथे मंदिर उभारण्यात आले. आजही कापसे घराण्याला वंशपरंपरेने पुजारीकी चालत आली आहे.

देवस्थानात यावर्षी दहा माळा आल्या आहेत. दररोज सकाळी नित्यपूजा व आरती तसेच संध्याकाळी आठ वाजता आरती होणार आहे. सोमवार, दि. २२ सप्टेंबर रोजी देवीचा



भव्य छबीना व मिरवणूक काढण्यात आली. विशेष कार्यक्रमांतर्गत शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत पाचव्या माळीच्या निमित्ताने गायक पोपट खिलारे भक्तिगाणी सादर करणार असून भाविकांना मसाला दूध वाटप केले जाणार आहे. बुधवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. संतोष पवार यांचा होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रम होणार आहे.

दसरा, गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी पारंपरिक सिलगन विधी पार पाडला जाणार असून त्यानंतर सुप्रसिद्ध गायिका रेणुका ताई शेंडगे जेजुरीकर यांचा देवीभक्तिगीतांचा कार्यक्रम तसेच वाघ्या-मुरळींचा पारंपरिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास बार्शीचे विद्यमान आमदार दिलीप सोपल साहेब हे उपस्थित राहणार आहेत.

या संपूर्ण नवरात्रोत्सवाचे आयोजन आकर्षक व भव्य पद्धतीने करण्यात आले आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचे दर्शन घ्यावे, असे आवाहन उद्योजक तथा तुळजाभवानी सामाजिक व बहुउद्देशीय संस्था संस्थापक अध्यक्ष नागेश शेठ चव्हाण यांनी केले आहे.



### मनीषाताई मोरे यांची खडकवासला विधानसभा दक्षिण महिला मोर्चा अध्यक्षपदी फेरनिवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी खडकवासला विधानसभा मतदारसंघ (दक्षिण) महिला मोर्चा अध्यक्षपदी सौ. मनीषाताई भगवान मोरे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल आमदार मा. भीमराव तापकीर, भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, तसेच धायरी-शिवणे मंडलअध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. धायरी-शिवणे मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी यावेळी नवनियुक्त कार्यकारिणीची घोषणा केली. मनीषा मोरे यांनी महिला वर्गासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले असून पक्षाच्या विविध उपक्रमांत त्या सक्रियपणे सहभागी झाल्या आहेत. त्यांच्या कामाची दखल घेत पुन्हा एकदा जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या फेरनिवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## जवळगाव प्रकल्प पर्यटनस्थळ घोषित करण्याची मागणी

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील जवळगाव मध्यम प्रकल्प भरून वाहू लागला असून सुमारे वीस गावांचा जीवनदायी स्रोत ठरत आहे. प्रकल्प ओव्हरफ्लो झाल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मात्र, प्रकल्पाशी संबंधित सुरक्षेच्या गंभीर समस्या कायम असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी निदर्शनास आणले. त्यांनी प्रकल्पाला पर्यटनस्थळ घोषित करण्याची मागणी केली.

चव्हाण यांनी सांगितले की, प्रकल्प परिसरात अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे सुरक्षा कटरी उभारणे आवश्यक आहे. जुनी ग्रील चोरीला गेली असून, भराव व कॅनॉल परिसरात झाडे-झुडपे वाढली आहेत. झुडपे न काढता पाणी सोडल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते, म्हणून तीव्र आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, पाटबंधारे उपअभियंता विराज परदेशी यांच्याशी चव्हाण यांनी



दूरध्वनीद्वारे संवाद साधून तातडीने कामे हाती घेण्याची गरज व्यक्त केली. परदेशी यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन दखल घेण्याचे आश्वासन दिले. तसेच, प्रकल्पावर पर्यटकांची मोठी वर्दळ असूनही पाटबंधारे कार्यालय व सोयीसुविधांचा अभाव आहे. त्यामुळे विकासासोबतच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी हा प्रकल्प पर्यटनस्थळ म्हणून घोषित करावा, अशी ठाम मागणी नागेश चव्हाण यांनी केली.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळगांव नं. २ येथे निरोप व स्वागत सत्कार समारंभ

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळगांव नं. २ ता. बार्शी येथे आज मुख्याध्यापक मा. विष्णु मस्के सर, सहशिक्षक मा. राजेंद्र कुंचाळे सर व सहशिक्षिका सौ. कांचन उपासे मॅडम यांचा निरोप सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

त्याचबरोबर नव्याने नियुक्त झालेले शिक्षक मा. सरवदे सर, मा. देशमाने सर व सौ. गाढेकर मॅडम यांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सभापती मा. अनिलकाका डिसले शेठ होते. यावेळी सरपंच राजकुमार धेंडे, उपसरपंच अभिजीत डिसले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बालाजी वीर, उपाध्यक्ष दत्तात्रय कापसे, सुरेशभाऊ कापसे, काकासाहेब ढेंगळे, संतोष चव्हाण, अजय डिसले, समर्थ डिसले, नितीन कापसे, माजी अध्यक्ष अशोक कापसे, अभिमन्यू ढेंगळे, अक्षय चव्हाण आदी



मान्यवरांसह अंगणवाडी सेविका, गावातील महिला पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या सात वर्षांत शाळेच्या सर्व शिक्षकांनी उल्लेखनीय कार्य केले. मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवणे, लोकवर्गणीतून शाळेचे रंगकाम करणे, सोलर पॅनल, पिण्यासाठी एआरओ प्लांट, प्रत्येक वर्गात एलईडी टीव्ही, खेळाचे साहित्य, सीसीटीव्ही बसवणे यासारख्या अनेक उपक्रमांत शिक्षकांचा मोलाचा सहभाग राहिला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तावृद्धीत त्यांचा वाटा अनमोल असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

निरोप प्रसंगी विद्यार्थ्यांनी भावनिक शब्दांत "सर पुन्हा या..." असे सांगत आपली आपुलकी व्यक्त केली. त्यामुळे संपूर्ण वातावरण क्षणभर भावनिक झाले.

गावकऱ्यांच्या व शाळेच्या वतीने सर्व शिक्षकांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.